# विशेष सर्वसाधारण सभा दि. ३० जानेवारी २०२२ पुणे

महाराष्ट्र राज्य टंकलेखन, लघुलेखन शासनमान्य संस्थांची संघटना, मुंबई संघटनेची ''विशेष सर्वसाधारण सभा'' रविवार दि.३०/१/२०२२ रोजी दुपारी १.०० वाजता ''अंतरिक्षा टॉवर्स'' पुणे स्टेशन, जिल्हा परिष्ज्ञदेसमोर, पुणे या ठिकाणी अध्यक्ष प्रकाश भिमराज कराळे यांचे अध्यक्षतेखाली ''ऑनलाईन'' आयोजित करण्यात आली होती या कामी सभेचा मिटिंग आयडी ३१४ ०३० १९६५ व पासवर्ड jjP3gc असा देण्यात आला होता त्याप्रमाणे संघटनेचे राज्य कार्यकारणी पदाधिकारी व काही सदस्य ऑफलाईन उपस्थित होते. संपुर्ण महाराष्ट्र राज्यातुन प्रमुख आजीव सभासद उपस्थित होते. सदरची सभा ''कोरोना'' ३ -या टप्प्याचे निर्बंध पाळुन आयोजित करण्ण्यात आली होती. सदरचे सभेचे इतिवृत्त पुढिल प्रमाणे :-

**विषय १** : संघटनेच्या विशेष सर्वसाधारण सभेची नोटिस वाचून कायम करणे.

**ठराव १** : आजचे विशेष सर्वसाधारण सभेची नोटिस संघटनेचे महासचिव हेमंत ढमढेरे यांनी वाचुन दाखविली. आजचे सभेचा मुख्य विषय संघटनेसाठी जागा खरेदी असल्याचे नमुद केले आहे. कोरोना-१९ मुळे मंत्रालय, कंपन्या, सहकारी संस्था, कारखाने व विविध संघटनांच्या सभा ऑनलाईन होत आहेत. त्यातुन सभासदांचा कोविड पासुन संरक्षण, खर्चात बचत व शासन आदेशाचे पालन हे पाळुन सभा आयोजित केल्याचे अध्यक्ष यांनी सांगितले. आजीव सभासदांनी मान्यता देवुन सभेचे कामकाज सुरु करणेस परवानगी दिली. प्रारंभी दिवंगत सभासद सामाजिक शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर यांना श्रध्दांजली वाहण्यात आली. सभेचा कोरम पुर्ण होणेसाठी ३० मिनिटांचा वेळ देण्यात येवुन सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.

**सुचक :-** प्रकाश कराळे
**अनुमोदक :-** रविंद्र शिंपी

**विषय २** : अतरिक्षा टॉवर्स येथे संघटनेसाठी कार्यालय /निवास व्यवस्थेसाठी जागा खरेदी करणेबाबत.

**ठराव २** : महाराष्ट्र राज्य टंकलेखन लघुलेखन शासनमान्य संस्थांची संघटना, मुंबई या संघटनेची नोंदणी १९६० ला झाली असुन गेली ५८ वर्षे स्वत:चे कार्यालय नाही, निवास व्यवस्था नाही. या कामी अनेक अधिवेशन आमसभा, कार्यकारणी सभेत चर्चा होवुन संघटनेचे कार्यालय असावे असे सभासदांकडुन मागणी होत असे. या कामी संघटनेकडे निधी जमा करुन तो मुदत ठेवी मध्ये वाढविणेत येत होता. आता संघटनेकडे ९० लाखाचे पुढे मुदत ठेवी असुन विदयमान कार्यकारणीने पुणे येथे कार्यालय / निवास व्यवस्थेसाठी जागा खरेदी करणेकामी ठराव पारित केलेला असुन ठरावातील निर्णयानुसार ''जागा खरेदी'' कामी दै. लोकमत मध्ये दरपत्रक मागविणेत आलेले असुन आलेले दरपत्रक खरेदी समितीचे सदस्य यांचे उपस्थितीत दिनांक १५/०१/२०२२ रोजी उघडण्यात आलेले असुन त्यात दरपत्रक (१) मे. ब्रम्हा कार्पोरेशन लि. पुणे, तपशिल : ३ रा मजला, फ्लॅट ५७.१५ चौ.मी. साधु वासवानी चौक, पुणे दर रु.१,२६,२०,०००/- दरपत्रक (२) LUM City Scape Ltd., कल्याणी नगर, पुणे तपशिल :- अंतरिक्षा टॉवर्स, ७१० चौ.फु. दर रु. १,४२,३०,५५०/- दरपत्रक (३) LUM City Scape Ltd., कल्याणी नगर, पुणे तपशिल :- २ बीएचके ६८५ चौ.फुट कारपेट ए अभ्युदय २ इमारत, स्टेशन रोड,

जी.प. समोर, पुणे दर रु. ८१,००,०००/- + खरेदी खर्च रु. ४,८६,०००/-, रजिस्ट्रेशन लिगल चार्ज रु. ३०,०००/- एकूण ८६,१६,०००/-(रजिस्ट्रेशन खर्चात कमी जास्त झाल्यास तो अधिकार अध्यक्ष, जनरल सेक्रेटरी यांना राहिल.) अशा प्रकारे प्राप्त दरपत्रकाची छाननी करण्यात येऊन राज्यकार्यकारणीच्या २० सदस्यांनी दरपत्रक दि. १५/१/२०२२ समिती सभेत उपस्थिती देऊन वरील दरपत्रकातील अ.क्र. ३)LUM City Scape Ltd., कल्याणी नगर, पुणे तपशिल :- २ बीएचके ६८५ चौ.फुट कारपेट ए अभ्युदय २ इमारत, स्टेशन रोड, जी.प. समोर, पुणे दर रु. ८१,००,०००/- + खरेदी खर्च रु. ४,८६,०००/-, रजिस्ट्रेशन लिगल चार्ज रु. ३०,०००/- एकूण ८६,१६,०००/-(रजिस्ट्रेशन खर्चात कमी जास्त झाल्यास तो अधिकार अध्यक्ष, जनरल सेक्रेटरी यांना राहिल.) अशा प्रकारे सदरची सदनिका घेणेस शिफारस केलेली असून या कामी विशेष साधारण सभा घेण्यात येऊन विशेष साधारण सभा ऑनलाईन / ऑफलाईन घेण्यात येऊन त्यास आजीव सभासदांची मान्यता घेण्यात येऊन जागा खरेदी बाबत अंतिम निर्णय घेण्यात यावा असे सुचविले होते त्याप्रमाणे आजची ऑनलाईन विशेष सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली असल्याचे अध्यक्षांनी सागितले तसेच अध्यक्षांनी ऑनलाईन सभेस उपस्थित असलेल्या आजीव सभासदांना संघटनेच्या कार्यालय अथवा निवास व्यवस्थेसाठी जागा खरेदी करणेबाबतच्या ठरावा सर्वांनी बहुमताने सहमती देऊन ठराव मंजूर करावा अशी विनंती करण्यात आली त्याप्रमाणे उपस्थित आजीव सभासद सर्वश्री १) यशवंत बोरसे, २) दिनेश कुलकर्णी, ३) विनय पार्टे, ४) सल्लाऊद्दीन पठाण, ५) योगेश सोन्रे, ६) एस. के. अय्यर, ७) संजय कांबळे, ८) विठ्ठल बडे, ९) प्रमोद मोंढे, १०) रविंद्र शिंपी, ११) अरुण चव्हाण, ११) आनंदी अय्यर, १२) प्रमोद दळवी, १३) चेतन बोठे, १४) ज्ञानेश्वर अजमिरे १५) दिलीप कुलकर्णी १६) विश्वास अभ्यंकर या सभासदांनी संघटनेच्या कार्यकारणीने जागा खरेदी करण्याचा निर्णय घेवुन ५८ वर्षात महत्वाचे काम केले तेही स्वभांडवलातुन कोणतेही कर्ज नाही ही बाब अभिनंदनीय असुन या कामी राज्य कार्यकारणीचे अभिनंदन करण्यात येवुन संघटनेसाठी LUM City Scape Ltd., कल्याणी नगर, पुणे तपशिल :- २ बीएचके ६८५ चौ.फुट कारपेट ए अभ्युदय २ इमारत, स्टेशन रोड, जी.प. समोर, पुणे दर रु. ८१,००,०००/- + खरेदी खर्च रु. ४,८६,०००/-, रजिस्ट्रेशन लिगल चार्ज रु. ३०,०००/- एकूण ८६,१६,०००/- (रजिस्ट्रेशन खर्चात कमी जास्त झाल्यास तो अधिकार अध्यक्ष, जनरल सेक्रेटरी यांना राहिल.) या प्रमाणे ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला. तसेच जागा खरेदी करणेबाबतचा अधिकार संघटनेचे अध्यक्ष प्रकाश भिमराज कराळे, जनरल सेक्रेटरी हेमत ढमढेरे, कोषाध्यक्ष सुभाष बागड, सहसचिव अरुण चांडक यांना देण्यात येऊन त्यांनी ३१ मार्च पुर्वी जागा खरेदी करुन व्यवहार पुर्ण करावेत असे ठरले व ठराव मंजूर करण्यात आला.

**सुचक :-** यशवंत बोरसे
**अनुमोदक :-** योगेश सोन्रे पाटिल

**विषय ३** : आजीव सभासदांकडून आलेल्या प्रश्नांवर चर्चा करुन निर्णय घेणे.

**ठराव ३** : संघटनेकडे अध्यक्ष, पुणे जिल्हा संघटना व महाराष्ट्र राज्य टंकलेखन संगणक टंकलेखन समस्या निवारण समितीचे सदस्य श्री. पंकज शामराव पवार यांचे जागा खरेदी बाबत आलेले पत्र वाचुन दाखविले. त्यांनी पत्रात संघटनेची तिजोरी रिकामी न करता त्यांची स्वत:ची जागा

वापरास देणेबाबत कळविल्याचे नमुद करण्यात आले, वास्तविक पाहता श्री. पंकज पवार हे सोशल मिडिया व संघटना पदाधिकारी यांचेवर नेहमीच आरोप प्रत्यारोप करत असतात ते स्वत: संघटनेचे आजीव सभासद दप्तरी असल्याचे निदर्शणास येत नाही त्यांच्या पत्राचा हेतू स्वच्छ वाटन नाही कारण आता कोरोना मुळे जागेचे दर कमी झालेत जागा स्वमालकीची होणार आहे. भविष्यात या जागेची किंमत दुप्पट होवु शकते. संघटनेचे कार्यालय, पत्रव्यवहाराचा कायम पत्ता ही जमेची बाजु असुन बहुसंख्य सभासदांचा जागा खरेदीचा आग्रह पाहता पंकज पवार यांचे अर्जाचा विचार करण्यात येवु नये असे ठरले व ठराव मंजुर करणेत आला.

**सुचक :-** सुरेश देवरे
**अनुमोदक :-** जे.के. वाघमारे

**विषय ३** : मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी येणा-या विषयावर चर्चा करुन निर्णय घेणे.

**ठराव ३** : सभेचे अध्यक्षांनी आजीव सभासदांना व संघटना पदाधिकारी यांना ऐनवेळी काही विषय सल्यास मांडण्याची सुचना केली. उपस्थित सदस्य व ऑनलाईन आजीव सभासद सर्वश्री यशवंत बोरसे, योगेश आंबेडकर, सुरेश देवरे, स्वप्नील पुसलेकर, राजेश श्रीवर्धनकर, सतिष पाटिल, तुळसीदास खसाळे, शरद मोहारे, निलेश वाटवे, राजेंद्र पवार, सुशिल अकाते, मनोज सोनटक्के, गणेश चोपडे, राजाभाऊ जाधव, स्नेहा कुलकर्णी सिध्दार्थ ढोले, चंद्रशेखर नल्लेवार, निला जुजे, वृंदा विसपुते, मुकुंदा श्रवणकर, शिला गवळी, अनुराधा थिटे, प्रकाश देसले, दिनेश पडवळ,आशा वारघडे, सुरेश बंगाली, अरुंधती **, संजय बोरुडे, रंगनाथ देशमाने इत्यादी सभासदांनी संघटनेसाठी स्वत:चे कार्यालय घेण्याचा निर्णय घेतल्याबद्दल आपल्या भावना व्यक्त करुन संघटनेच्या कार्याचा गौरव केला. श्री.प्रमोद मोंढे यांनी कार्यालयाचा वापर व इतर खर्चासाठी नाममात्र शुल्क आकारण्याची सुचना केली. यावेळी अध्यक्षांनी जागेचा वापर संघटनेचे कार्यालय, मिटिंग हॉल व महिला आणि पुरुष यांचेसाठी एक एक रुम मध्ये किमान १० अतिथी मुक्कामी राहतील अशी व्यवस्था केली जाईल व त्याचे शुल्क राज्य कार्यकारी मंडळ वेळोवेळी ठरविल त्या प्रमाणे आकारले जाईल असे नमुद केले. सभेत जेष्ठ सदस्य शैलेंद्र पाटिल, गोवर्धन विरकुंवर, संध्या देशपांडे, प्रकाश कुलकर्णी, नंदकुमार देशमुख, अनुरथ घुमरे, घनश्याम कुंबळकर, अभिलाषा नाईक, जोसेफ रुबेन, संतोष झंजाड, समिर म्हात्रे, सुभाष बागड, प्रमोद वाणी, श्रीकांत जोशी, अरुण चांडक, संजय नाईक आदिंनी ठरावास पाठिंबा दिला व सर्व आजीव सभासदांचे आभर मानले व ठराव मंजुर करणेत आला.

**सुचक :-** निलेश वाटवे
**अनुमोदक :-** राजेश श्रीवर्धनकर

शेवटी उपस्थित राज्य कार्यकारणी सभासदांना अल्पोपहार देऊन सभेचे काजकाज समाप्त करण्यात आले.

**अध्यक्ष**